## संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807

ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230

क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 124 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 25.08.2025

**प्रति,**

**मा. मुख्य वनसंरक्षक,**
**( शिक्षण व प्रशिक्षण )**
**म.रा.पुणे.**

**विषय**:- प्रत्येक महिण्याकरीता वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 62 मधील प्रशिक्षणार्थीचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले **राज्य योजने** अंतर्गत अल्प मुदत प्रशिक्षण (**सत्र क्र.** 1,2,3 **व सत्र क्र.** 4,5,6) मधील प्रशिक्षणार्थीचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक 01/07/2025 ते 31/07/2025 पर्यंतचा मासीक शैक्षणीक अहवाल सोबत सहपत्रीत करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे पेज क्रं 1 ते 26.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
**संचालक,**
**वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.**

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
**संचालक,**
**वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.**

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नव नियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण**, **व्यावसायिक** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 29/03/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा प्रविष्ट नव नियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 62 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **राज्य योजने अंतर्गत** दिनांक **01/07/2025 ते 31/07/2025** या कालावधीमध्ये **लिपीक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल** यांचे **पाच दिवसीय अल्प मुदतीचे** प्रशिक्षण एकुण **सहा** सत्रांमध्ये आयोजीत करण्यात आले.

**दिनांक** 01/07/2025 **ते** 31/07/2025 या कालावधीत, संस्थेच्या आदरणीय **संचालिका मा. कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** मॅडम यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/07/2025 ते 31/07/2025** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक करणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | स्व. वसंतराव फुलसिंग नाईक, यांची जयंती. ( दि. 01/07/2025 ) | 3 |
| 02 | नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 चा विदर्भ दौरा कार्यक्रम. ( दि. 01/07/2025 ते 05/07/2025 ) | 4 ते 5 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र अभ्यासक्रम. ( दि. 07/07/2025 ते 02/08/2025 ) | 6 ते 7 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 विदर्भ दौरा परीक्षा. ( दि. 15/07/2025 ) | 8 ते 9 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांना Wild Surakshe- Public Health and Safety Programme या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 16/07/2025 ) | 10 ते 11 |
| 06 | माहिती अधिकार अधिनियम 2013 या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 19/07/2025 ) | 12 ते 13 |
| 07 | कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, 2013 (The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 विषयावर प्रशिक्षण. ( दि. 21/07/2025 ) | 14 ते 15 |
| 08 | वीर बाजीप्रभू देशपांडे यांची पुण्यतिथी. ( दिनांक 13/07/2025.) | 16 |
| 09 | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती. (दिनांक 23/07/2025) | 17 ते 18 |
| 10 | राज्य योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे प्रशिक्षण (एकुण 6 सत्र ) कार्यक्रम ( माहे जुलै 2025 ) | 19 ते 26 |

# 1. **स्व. वसंतराव फुलसिंग नाईक, यांची जयंती.** ( दि. 01/07/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 1 **जुलै 2025** रोजी महाराष्ट्राचे **माजी मुख्यमंत्री** आणि **हरित क्रांतीचे** शिल्पकार **स्व. वसंतराव फुलसिंग नाईक**, यांची जयंती **कु. मुक्ताबाई वि टेकाळे, संचालक**, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात व आदरपूर्वक साजरी करण्यात आली.

**स्व. वसंतराव फुलसिंग नाईक** , यांचा जन्म 1 **जुलै** 1913 रोजी **गहुली, पुसद** (यवतमाळ जिल्हा), मध्य भारतातील **गहुली** या **गावात** झाला होता. त्यामुळे त्यांची जयंती दरवर्षी 1 **जुलै** रोजी साजरी केली जाते. या दिवशी त्यांच्या योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र शासनाने **" महाराष्ट्र कृषी दिन "** म्हणून 1 **जुलैची** घोषणा केली आहे. देशात आणि विदेशात, महाराष्ट्रात, वसंतराव नाईक यांच्या हरित क्रांतीतील भूमिकेला गौरव म्हणून या दिवशी विविध कार्यक्रम, कृषी प्रदर्शन, विचारमंथन, आणि शेतकरी कल्याण विषयक सभा आयोजित केल्या जातात. वसंतराव फुलसिंग नाईक हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत प्रभावशाली आणि दीर्घकाळ मुख्यमंत्रीपद भूषवलेले नेते होते. त्यांना **" हरित क्रांतीचे शिल्पकार "** म्हणूनही ओळखले जाते. वसंतराव नाईक हे **महाराष्ट्राचे सर्वात दीर्घकाळ मुख्यमंत्री** राहिलेले नेते होते. त्यांनी **59 महिने** सलग मुख्यमंत्रीपद भूषवले ( 5 डिसेंबर 1963 ते 20 फेब्रुवारी 1975 ). हा विक्रम आजही कायम आहे.

**त्यांनी अंमलात आणलेली महत्वाची धोरणे** : हरित क्रांतीला चालना देणारी धोरणं व योजनांची अंमलबजावणी, सिंचन प्रकल्प, खत योजना, कृषी सुधारणा, ग्रामीण भागात रस्ते व वीजपुरवठा, रोजगार हमी योजना.

**घटनात्मक निर्णय** : 1972 मधील महाराष्ट्रातील मोठ्या दुष्काळावर त्यांनी प्रभावी उपाययोजना केल्या. ते **" शेतकऱ्यांचे मुख्यमंत्री "** म्हणून प्रसिध्द झाले.

**सन्मान** : त्यांच्या जन्मदिनी, 1 जुलैला महाराष्ट्र कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी हे त्यांच्याच नावाने आहे. वसंतराव नाईक शेतकरी आत्महत्याप्रवण क्षेत्र विशेष पॅकेज केंद्र सरकारकडून जाहीर करण्यात आली होती.

**संदर्भ व स्मरण** : वसंतराव नाईक यांचे आयुष्य हे महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाच्या उत्थानासाठी समर्पित होते. त्यांच्या कार्यशैलीचा अभ्यास अनेक प्रशासन प्रशिक्षणात केला जातो.

**व्यक्तिमत्व व वारसा** : साधं जीवन - उच्च विचार या तत्वावर ते चालत. त्यांचे नेतृत्व ग्रामीण विकासावर केंद्रित होते. कृषी, सिंचन आणि शेतकऱ्यांच्या आत्मनिर्भरतेसाठी त्यांनी महत्वाचे निर्णय घेतले.

# 2. **नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 62 **चा विदर्भ दौरा कार्यक्रम**.

## ( **दि.** 01/07/2025 **ते** 05/07/2025 )






वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांचा दिनांक **23/06/2025 ते 05/07/2025** या कालावधी मध्ये **विदर्भ दौरा** आयोजित करण्यात आला होता. सदर कालावधी मध्ये सर्व प्रशिक्षणार्थी यांनी दौऱ्या दरम्यान खालील प्रमाणे विविध ठिकाणांवर भेट दिली.

| **अ.क्र.** | **दिनांक व वार** | **भेटीचे ठिकाण** | **भेटीचे कारण** |
|---|---|---|---|
| 01 | 01/07/2025<br>मंगळवार | **चंद्रपुर ते ताडोबा** | 1) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट. इको टुरीझम व पर्यटणामध्ये स्थानिकांचा सहभाग, मानव वन्यजीव संघर्ष व अवैध शिकार या मधिल आव्हानांबद्दल अभ्यास व समस्या प्रभावीपणे मधील हाताळण्याबाबत माहिती घेणे.<br>2) वन्यजीव सवंर्धण आणि अधिवास व्यवस्थापण बाबत अभ्यास.<br>3) वाघांचा मागोवा आणि निरीक्षण करुन त्याची नोंद घेण्यामध्ये वनरक्षकांची भुमीका. परत वन प्रबोधिनी, चंद्रपूर येथे मुक्काम. |
| 02 | 02/07/2025<br>बुधवार | **चंद्रपुर ते नवेगावबांध** | 1) प्रवासादरम्यान ब्रम्हपुरी आणि वडसा येथील वृक्षारोपन आणि रोपवाटीकेला भेट.<br>2) नवेगावबांध येथील पर्यटन संकुलास भेट आणि पर्यटन अभ्यास. |
| 03 | 03/07/2025<br>गुरुवार | **नवेगावबांध ते राष्ट्रीय उद्यान व पुनर्वसन गावास भेट** | 1) नवेगाव राष्ट्रीय उद्यानाला भेट आणि जलीय परीसंस्थेचे व्यवस्थापन कसे केले जाते याचा अभ्यास करणे.<br>2) राष्ट्रीय उद्याणातील गावांच्या स्वैच्छिक पुनर्वसनाच्या प्रक्रीयेचा आणि परीणामांचा अभ्यास करणे.<br>3) शिकार विरोधी शिबीरे आणि एम स्ट्रीप पेट्रोलींगच्या कार्याचा अभ्यास करणे. मुक्काम पर्यटन संकुल नवेगावबांध. |
| 04 | 04/07/2025<br>शुक्रवार | **नवेगावबांध ते नागपुर सालेकसा चुलबंद** | नवेगाव बांध प्रवास दरम्यान वन विकास महामंडळाच्या चुलबंद नर्सलीला भेट देणे, आणि स्थानिक नागरीकांनी केलेल्या सालेकसा येथील पर्यावरणीय उपक्रमांचे व्यवस्थापन याबाबतचा अभ्यास. मुक्काम MLA HOSTEL,नागपुर. |
| 05 | 05/07/2025<br>शनिवार | **नागपुर ते T.T.C. सेंटर गारेवाडा** | गोरेवाडा येथील सफारी तसेच Transit Treatment Centre, येथे भेट व मार्गदर्शन, पुढील प्रवास चिखलदरा. |




विदर्भ दौरा







## 3. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र अभ्यासक्रम.
## ( दि. 07/07/2025 ते 02/08/2025 )







वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी दिनांक 05/07/2025 रोजी दौऱ्या वरुन आल्या नंतर प्रशिक्षणार्थींचे **द्वितीय सत्राचे** नियमीत पणे वर्ग चालु झाले. **दि. 07/07/2025 ते 02/08/2025** या कालावधी मध्ये प्रशिक्षणार्थींना **द्वितीय सत्राचे** खालील विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

| सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 62 (कालावधी दि. 29/03/2025 ते 24/09/2025) | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ** (Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **संगणक** | श्री. ए. बी. गेडाम, लिपीक, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा.<br>श्री. आनंद एस. पीडीयार, तालुका व्यवस्थापक, आपले सेवा केंद्र. पं.स. चिखलदरा. | **संगणक** (Computer)<br>प्रशिक्षणार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान देण्यात आले.<br>**अभ्यासाचे मुद्दे:** MS Office (Word, Excel, Power Point) ई-मेल व इंटरनेट वापर ऑनलाईन वनविभाग संबंधित सॉफ्टवेअरचा उपयोग<br>**उद्देश:** कार्यालयीन कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर. |
| 03 | **वनव्यवस्थापन** | श्री. डॉ. श्रीकांत सोनोने. | **वनव्यवस्थापन**(Forest Management) वनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन कसे करावे याचे प्रशिक्षण दिले गेले.<br>**मुख्य मुद्दे:** वनीकरणाचे प्रकार वनक्षेत्राची तपासणी, वृक्ष लागवड व संगोपन वनातील जैवविविधतेचे संरक्षण. |
| 04 | **वनसंरक्षण** | श्री. एस. बी. गुल्हाणे, उपसंचालक, (से.नि.) | **वनसंरक्षण**(Forest Protection) वनांचे संरक्षण व पर्यावरण संतुलन राखण्याचे महत्त्व समजावून देण्यात आले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **प्रमुख बाबी:** अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण, वन्यजीव संरक्षण, कायदे जनजागृती व सहभाग. |
| 05 | **व्यवस्थापकिय कौश्यल्य** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **व्यवस्थापकीय कौशल्य** (Managerial Skills) वनरक्षक म्हणून आवश्यक नेतृत्व व व्यवहार कौशल्यांचे प्रशिक्षण.<br>**अभ्यासाचे भाग:** निर्णय घेणे, संकट व्यवस्थापन, संघटनकौशल्य, जनसंपर्क कौशल्य. |
| 06 | **वनउपयोगीता** | श्री. आर. बी. गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) | **वन उपयोगिता** (Forest Utilization) वनसंपत्तीचा शाश्वत उपयोग कसा करावा हे शिकवण्यात आले.<br>**प्रमुख घटक:** इंधन, औषधी वनस्पती, बांबू, गवत यांचा उपयोग स्थानिक समुदायाचा सहभाग बाजारपेठेतील मागणी व पूर्ती व्यवस्थापन. |
| 07 | **संयुक्त वनव्यवस्थापन** | श्री. एस. बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **संयुक्त वन व्यवस्थापन** (Joint Forest Management JFM)<br>स्थानिक समुदाय व वनविभाग यांचा समन्वय साधून वनसंवर्धन करणे.<br>**मुख्य तत्वे:** ग्रामसभा व वन समित्यांची भूमिका हक्क व जबाबदाऱ्या फायदे वाटप यंत्रणा. |
| 08 | **लेखा व कार्यप्रणाली** | श्री. जी. बी. महाजन, लेखाअधिकारी (से.नि.) | **लेखा व कार्यप्रणाली** (Accounts and Procedure)<br>वनविभागातील आर्थिक व्यवहार व प्रशासकीय प्रक्रिया समजावून देण्यात आली. अभ्यासाचे भाग: लेखा पुस्तिका व नोंदी, सरकारी निधीचा उपयोग, बजेट तयार करणे, रिपोर्ट लेखन व सादरीकरण. |

## निष्कर्ष

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सत्र क्रमांक 62 मधील नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थ्यांना दिले गेलेले हे सखोल, सर्वसमावेशक आणि विषयनिष्ठ प्रशिक्षण हे केवळ शारीरिक वा तांत्रिक क्षमतांच्या जोपासनेसाठी नव्हे, तर एकूणच वन प्रशासनाच्या कार्यक्षम, उत्तरदायी, आणि जनतेच्या हिताचे रक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे घडवणारे प्रशिक्षण होते.

या प्रशिक्षणादरम्यान **कवायत व खेळांद्वारे** शारीरिक क्षमतावाढ, सहकार्य, आणि शिस्तबद्धता यांचा विकास झाला, तर **संगणक शिक्षणामुळे** आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून कार्यालयीन कामात सुसूत्रता आणण्याची तयारी झाली. **वनव्यवस्थापन व वनसंरक्षण** या मूलभूत विषयांनी प्रशिक्षणार्थ्यांना वनसंपत्तीच्या शास्त्रीय व्यवस्थापनाचे व संवर्धनाचे कौशल्य प्राप्त करून दिले.


**व्यवस्थापकीय कौशल्य आणि माहिती अधिकार अधिनियमाचा** अभ्यास करून, प्रशिक्षणार्थ्यांना प्रशासनिक प्रक्रिया, नागरिकांशी पारदर्शक संवाद, आणि कायदेशीर मर्यादांचे पालन याची सखोल समज प्राप्त झाली. **वनउपयोगिता आणि संयुक्त वन व्यवस्थापन** यामुळे स्थानिक समुदायाचा सहभाग, वनउत्पन्नाचा शाश्वत उपयोग, आणि पर्यावरणीय समतोल राखण्याचे तत्वज्ञान शिकवले गेले.

**लेखा व कार्यप्रणाली** यावर दिले गेलेले प्रशिक्षण हे अत्यंत व्यावहारिक होते. सरकारी निधींचे योग्य व पारदर्शक व्यवस्थापन, प्रशासकीय प्रक्रिया, आणि आर्थिक शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले गेले. हे प्रशिक्षण वनरक्षकाला एक जबाबदार शासकीय सेवक म्हणून सक्षम करते.

यातून स्पष्ट होते की या प्रशिक्षण कार्यक्रमात केवळ सिध्दांतिक अध्ययन नव्हे, तर प्रायोगिक, व्यवहार्य आणि वास्तवाशी जोडलेले शिक्षण देण्यात आले. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांना फक्त वनसंवर्धक नव्हे तर एक सामाजिक नेता, कायद्याचा पालनकर्ता, आणि पर्यावरणप्रेमी जबाबदार अधिकारी म्हणून घडवण्याचा उद्देश या प्रशिक्षणामागे आहे.

अशा प्रकारच्या सर्वांगीण प्रशिक्षणामुळेच प्रशिक्षणार्थी वनरक्षक हे आपापल्या कार्यक्षेत्रात वन संवर्धन, वन्यजीव संरक्षण, आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सज्ज, सक्षम आणि सजग ठरतात. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश नवीन वनरक्षकांना वनविभागातील कार्यक्षम व जबाबदार अधिकारी म्हणून तयार करणे हा होता. सर्व प्रशिक्षण कृतीक्षम, संप्रेषणक्षम व क्षेत्रीय अंमलबजावणीकडे लक्ष देणारे होते.

## 4. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 विदर्भ दौरा परीक्षा दि. 15/07/2025



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांचा दिनांक **23/06/2025 ते 05/07/2025** या कालावधी मध्ये प्रशिक्षणार्थीचा **विदर्भ दौरा** आयोजित करण्यात आला होता, त्या अनुषंगाने तुकडी क्र. 62 मधील सर्व प्रशिक्षणार्थी यांची **दि.** 15/07/2025 रोजी **विदर्भ दौरा परीक्षेचे** आयोजन करण्यात आले.

**दौरा परीक्षा - स्वरूप व आयोजन :**

विदर्भ दौऱ्यावरून परतल्यानंतर, प्रशिक्षण संस्था प्रशासनामार्फत एक परीक्षा आयोजित करण्यात आली. या परीक्षेचा उद्देश म्हणजे प्रशिक्षणार्थ्यांनी दौऱ्यात काय निरीक्षण केले, काय शिकले याचे आकलन तपासणे.

**प्रशिक्षणार्थ्यांना परीक्षेचा भविष्यातील फायदे :**

दौरा परीक्षा प्रशिक्षणार्थ्यांसाठी केवळ गुणांकनापुरती मर्यादित नसून, त्यातून पुढील वास्तविक वन सेवा कार्यासाठी बळकट पाया तयार होतो.

**परीक्षेचे व दौऱ्याचे फायदे** :

1. **प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण (**Field Learning):
वनक्षेत्राचा प्रत्यक्ष पाहणी अनुभव, वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास समजून घेणे, स्थानिक अडचणी, पर्यावरणीय धोके समजणे.

2. **अभ्यास व निरीक्षण कौशल्यात वाढ:** दौऱ्यादरम्यान निरीक्षण केलेल्या बाबी नोंदवण्याची सवय, तपशीलवार माहिती लक्षात ठेवण्याची क्षमता वाढते, पर्यावरणीय घटकांशी जोडलेली माहिती आत्मसात होते.

3. **सादरीकरण कौशल्य:** गट कार्य आणि संवादकौशल्य यामध्ये वाढ, रिपोर्ट लेखन, प्रेझेंटेशन तयार करणे याचा सराव वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मविश्वासाने माहिती मांडण्याचा अनुभव.

4. **आगामी सेवा परीक्षांमध्ये मदत:** पुढील पदोन्नती परीक्षा किंवा खात्यांतर्गत चाचण्यांसाठी आधारभूत माहिती व्यावसायिक उत्तरलेखन व विश्लेषणात्मक विचारशक्तीमध्ये प्रगती.

5. **वन प्रशासनातील भूमिका स्पष्ट होते:** विविध प्रकल्पांची कार्यपद्धती समजते एका वनरक्षकाच्या जबाबदाऱ्या केवळ जंगल संरक्षकाच्या पलीकडे जातात, हे समजते पर्यावरण संवर्धनासोबतच सामाजिक सहभाग, पर्यटन व्यवस्थापन, कायदा अंमलबजावणी इ. बाबींचा परिचय होतो.

## निष्कर्ष:

विदर्भ दौरा आणि त्यानंतर घेण्यात आलेली दौरा परीक्षा ही नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. या दौऱ्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न राहता, प्रत्यक्ष वनक्षेत्रात जाऊन भौगोलिक, जैविक, पर्यावरणीय, आणि सामाजिक पैलूंचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. या अभ्यासदौऱ्यात त्यांनी विविध राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, जैवविविधता केंद्रे, आणि इको-पर्यटन स्थळांना भेटी दिल्या. त्यांनी प्रत्यक्ष निरीक्षणातून वन्यजीवांचे नैसर्गिक वर्तन, स्थानिक हवामान परिस्थिती, वनस्पतींची विविधता, आणि वन संरक्षणातील अडथळे समजून घेतले.

याच ज्ञानाच्या मूल्यांकनासाठी घेण्यात आलेली दौरा परीक्षा म्हणजे त्यांना स्वतःच्या निरीक्षणाचे सादरीकरण करण्याची संधी होती. दौरा परीक्षा केवळ गुण मिळवण्यासाठी नव्हे, तर ती एक आकलन तपासणी (Assessment of Understanding) होती, ज्यातून प्रशिक्षणार्थ्यांच्या तांत्रिक समज, निरीक्षण कौशल्य, सर्जनशीलता, संवाद कौशल्य, आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेचा परीघ निश्चित केला गेला.

या प्रकारची मूल्याधारित परीक्षा वनरक्षक पदासाठी अत्यंत उपयुक्त ठरते कारण, प्रत्यक्ष क्षेत्रात कार्यरत असताना त्यांना स्थानिक परिस्थिती समजून घेऊन तात्काळ निर्णय घ्यावा लागतो, वन्यजीवांचे संरक्षण करताना स्थानिक समाजाशी संवाद साधावा लागतो, वनगुन्हे रोखताना कायद्याची माहिती आणि प्रत्यक्ष कारवाईमध्ये समतोल राखावा लागतो, पर्यावरणीय संकटांवर तातडीने कृती करावी लागते.

या दौऱ्यातील अनुभव, आणि परीक्षेतून आलेली समज, प्रशिक्षणार्थ्यांमध्ये प्रशासनिक जाण, जबाबदारीची भावना, आणि नैतिकता यांचे बीज रोवते. हीच शिकवण पुढे त्यांच्या सेवेत एक कुशल, व्यावसायिक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि संवेदनशील वनरक्षक घडवते.

वरील प्रक्रियेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे प्रशिक्षणार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो की ते आता प्रत्यक्ष वनक्षेत्रात कार्य करण्यास सक्षम आहेत. त्यांच्या विचारांमध्ये व्यापकता येते. **त्यांना हे कळते की वनरक्षकाची जबाबदारी म्हणजे केवळ झाडे राखणे नव्हे, तर एक जैविक प्रणालीचे रक्षण, समाजाचे पर्यावरणीय शिक्षण, आणि कायद्याचे अंमलबजावणी ही सुद्धा त्यात समाविष्ट आहे.**

## एकूण निष्कर्ष:

विदर्भ दौरा आणि त्या अनुषंगाने घेतलेली परीक्षा ही प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमातील एक अत्यंत प्रभावी आणि व्यावहारिक पायरी होती. या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य, आणि आचरण या तीन पातळ्यांवर प्रगती केली आहे. भविष्यात ही परीक्षा आणि त्यात मिळालेले शिकवण अनुभव हे त्यांना वन प्रशासनात कार्यक्षम ठरण्याचे मुख्य साधन ठरेल.

ही प्रक्रिया त्यांच्यातील "फक्त शिकणाऱ्या प्रशिक्षणार्थी" या ओळखीला पार करून "कर्तव्यदक्ष वन अधिकारी" म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाला घडवणारी ठरली आहे.

5. **नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 62 **यांना** Wild Surakshe- Public Health and Safety Programme **या महत्त्वपूर्ण विषयावर प्रशिक्षण**.

( दि. 16/07/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांना **श्रीमती. नेहा भंडारी** (Project Co-ordinator) व **श्री. रविशंकर दरेकर** (Project Co-ordinator) व्याख्याते यांनी **Wild Surakshe- Public Health and Safety Programme** या विषयावर प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले.

या प्रशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे वनरक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये सार्वजनिक आरोग्य, वैयक्तिक सुरक्षितता आणि वनक्षेत्रात काम करताना उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक संकटांपासून बचाव याबाबतची जागरूकता निर्माण करणे होय.

**सत्रामध्ये समाविष्ट केलेले महत्त्वाचे मुद्दे:**

1. **सार्वजनिक आरोग्याचे मूलतत्त्व:** स्वच्छता व व्यक्तिगत आरोग्याची काळजी संसर्गजन्य रोग व त्यांचे प्रतिबंध.

2. **वनामध्ये सुरक्षिततेचे उपाय:** वन्यप्राण्यांपासून संरक्षण सर्पदंश आणि विषारी कीटकांपासून संरक्षण प्राथमिक उपचार प्रशिक्षण.

3. **आपत्कालीन परिस्थितीत कृती योजना:** अग्निशमन उपाय आपत्कालीन संपर्क यंत्रणा जलप्रदूषण आणि अन्न विषबाधेपासून प्रतिबंध.

4. **मानसिक आरोग्य व ताण व्यवस्थापन:** वनसेवेत मानसिकतणाव व्यवस्थापनाचे तंत्र.

**कार्यक्रमाचा उद्देश:** प्रशिक्षणार्थींना वन क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजासाठी शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून सक्षम बनवणे. आपत्कालीन परिस्थितींना सामोरे जाण्याची तयारी करून घेणे. आरोग्यविषयक आणि सुरक्षा संदर्भातील मूलभूत ज्ञान प्रदान करणे.




**(सेंटर फॉर वाईल्डलाईफ स्टडीज (रिवाइल्डिंग इंडिया) ही वन्यजीव संशोधन, नैसर्गिक अधिवास संवर्धन तसेच धोरण व शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखित झालेली मान्यताप्राप्त संस्था, आहे.)**

# 6. माहिती अधिकार  अधिनियम 2013 ( दि. 19/07/2025 )



**श्री. प्रा. राजेश पाटील, रा.अमळनेर यांनी प्रशिक्षणार्थ्यांना माहिती अधिकार अधिनियम** 2005 **व** 2013 **सुधारणा (**RTI Act 2005 & 2013 Amendment) **या महत्वपुर्ण विषयावर प्रशिक्षण दिले.**



**महत्त्व वनरक्षकांसाठी:**

वन विभागातील कामकाज हे लोकाभिमुख आणि पारदर्शक असावे लागते. त्यामुळे वनरक्षक म्हणून RTI कायदा समजून घेणे

आणि त्यानुसार कार्य करणे आवश्यक आहे. नागरीकांकडून आलेल्या माहितीच्या मागण्या योग्य पद्धतीने हाताळणे हे देखील प्रशिक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे.

**निष्कर्ष**:

माहितीचा अधिकार अधिनियम (RTI Act) ही लोकशाहीतील एक महत्वाची पायरी असून, नागरिकांना शासनाच्या कार्यप्रणालीबाबत पारदर्शकता व जबाबदारी यांची हमी देते. या अधिनियमामुळे सामान्य नागरिकालाही प्रशासकीय निर्णयांबाबत विचारता येते, शंका मांडता येते आणि माहितीची मागणी करता येते.

वन विभागासारख्या संवेदनशील व सार्वजनिक हिताशी संबंधित क्षेत्रात काम करणाऱ्या वनरक्षकांसाठी RTI कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या कामकाजामध्ये पारदर्शकता ठेवणे, कायद्यानुसार माहिती नोंदी तयार ठेवणे, आणि नागरिकांना योग्य माहिती वेळेत देणे या जबाबदाऱ्या पार पाडणं आवश्यक आहे.

या कायद्याची अंमलबजावणी केल्यामुळे शासनावर लोकांचा विश्वास वाढतो, तर कर्मचारी अधिक जबाबदारपणे कार्य करतात. त्यामुळे, प्रशिक्षणार्थी वनरक्षकांनी हा कायदा केवळ वाचून न घेता, तो प्रत्यक्ष कार्यात कसा वापरायचा याचे भान ठेवले पाहिजे. माहितीची अचूकता, पारदर्शकता व उत्तरदायित्व या तिन्ही मूल्यांचा अंगीकार केल्यास कार्यप्रणाली अधिक प्रभावी आणि जनहितवादी ठरते.



7. **कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम**, 2013 (The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 दि. 21/07/2025




**श्री.** प्रा. **राजेश पाटील**, रा.**अमळनेर यांनी प्रशिक्षणार्थ्यांना कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम**, 2013 (The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 **या महत्वपुर्ण विषयावर प्रशिक्षण दिले**.

**निष्कर्ष**

कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम, 2013 हा एक महत्त्वाचा कायदा आहे. जो कार्यस्थळी महिलांसाठी सुरक्षित, सन्मानजनक आणि समतेचा वातावरण निर्माण करण्यासाठी बनवला गेला आहे. या कायद्यामुळे महिलांना आपल्या अधिकारांची जाणीव होते, आणि त्यांना छळासंदर्भात तक्रार करण्यासाठी एक ठोस व कायदेशीर व्यवस्था उपलब्ध होते.

वन विभागामध्ये महिला कर्मचारी, वन अभ्यासक, पर्यटक, किंवा स्वयंसेवक यांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थी वनरक्षकांनी या कायद्याच्या तरतुदी समजून घेणे अनिवार्य आहे. लैंगिक छळ म्हणजे काय, त्याची लक्षणे कोणती, कायद्याने कोणती जबाबदारी कर्मचारी आणि संस्थेवर टाकलेली आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे.

या अधिनियमामुळे एक सकारात्मक कार्यसंस्कृती तयार होते, ज्यात महिलांना आत्मसन्मानाने, निर्भयपणे काम करता येते. प्रत्येक वन कर्मचारीने या कायद्याचे पालन करणे, महिलांच्या हक्कांचे रक्षण करणे व लैंगिक समानतेची जाणीव ठेवणे ही काळाची गरज आहे. यामुळे केवळ संस्था नाही, तर संपूर्ण समाजही सुरक्षित व प्रगतशील होतो.





8. **वीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित केले. दिनांक** 13/07/2025.




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 मधील सर्व प्रशिक्षणार्थी यांनी **दि**. 13/07/2025 रोजी **वीर बाजीप्रभू देशपांडे** यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित केले. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे **वीर बाजीप्रभू** यांच्या **प्रतिमेचे पूजन** आणि प्रशिक्षणार्थ्यांसाठी विशेष आयोजन करण्यात आलेले **' पावनखिंड '** चित्रपटाचे प्रदर्शन.

**पूजन सोहळा** : कार्यक्रमाची सुरुवात **वीर बाजीप्रभू देशपांडे** यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. या वेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी, आणि प्रशिक्षणार्थींनी वीर बाजीप्रभूंच्या **शौर्याला** अभिवादन करत त्यांच्या देशभक्तीची आठवण जागवली. त्यांच्या बलिदानाचे महत्व अधोरेखित करणारे उब्दोधक भाषणही यावेळी झाले.

**पावनखिंड चित्रपट प्रदर्शन** : यानंतर प्रशिक्षणार्थ्यांसाठी **'पावनखिंड '** हा ऐतिहासिक चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. या चित्रपटात बाजीप्रभू देशपांडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सिंहगडावरून **छत्रपती शिवाजी महाराजांच्या** सुटकेसाठी दिलेले **अद्वितीय बलिदान** प्रभावीपणे दाखवले आहे. चित्रपटाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना शौर्य, त्याग, आणि कर्तव्यनिष्ठेचा प्रेरणादायी संदेश मिळाला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** : हा कार्यक्रम फक्त एक औपचारिक कार्यक्रम न राहता, इतिहासातील थोर वीरांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन राष्ट्रसेवा अणि पर्यावरणसंवर्धन यामध्ये समर्पित भावनेने काम करण्याची जाणीव निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

**वीर बाजीप्रभू देशपांडे** यांनी 13 **जुलै** 1660 रोजी पावनखिंडच्या लढाईत **छत्रपती शिवाजी महाराजांच्या** सुटकेसाठी प्राणांची आहुती दिली. ही खिंड पूर्वी **" घोडखिंड "** म्हणून ओळखली जात होती, परंतु **बाजीप्रभूंच्या अद्वितीय शौर्यामुळे** तिला **'पावनखिंड ' हे** नाव देण्यात आले.

अशा प्रकारच्या उपक्रमांद्वारे युवकांमध्ये **देशभक्तीचे बीज** रोवले जाते आणि आपल्या **संस्कृतीचा गौरव** जपला जातो.

## 9. **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती**. ( दिनांक 23/07/2025 )




**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक** यांची जयंती वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे अत्यंत प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक वातावरणात **कु. मुक्ताबाई वि टेकाळे, संचालक,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात संस्थेतील अधिकारी व कर्मचारी आणि तुकडी क्र. 62 मधील सर्व प्रशिक्षणार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि टिळकांच्या जीवनकार्याचा पुनःआविष्कार अनुभवला.

कार्यक्रमामध्ये टिळकांच्या कार्याचे विविध पैलूंमधून सादरीकरण झाले. त्यांचे राष्ट्रभक्तिपूर्ण विचार, स्वराज्याची ठाम भूमिका, आणि सामाजिक प्रबोधनाच्या क्षेत्रातील योगदान यावर सखोल विचारमंथन करण्यात आले. त्यांच्या स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे या घोषणेने आजही जनतेच्या मनात चेतना निर्माण होते, हे अधोरेखित करण्यात आले.

टिळकांनी ज्या प्रकारे लोकजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती यांसारख्या उपक्रमांची सुरुवात केली, त्यातून त्यांनी सामान्य माणसाला राष्ट्रीयतेच्या प्रवाहात सामील करून घेतले. त्यांच्या विचारांत स्पष्टता, कृतीत ठामपणा, आणि जीवनात नीतिमूल्यांची दृढ निष्ठा होती.

या जयंती कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित अधिकारी आणि कर्मचारी यांना राष्ट्रसेवेसोबत सामाजिक भान, न्याय, आणि सत्याच्या मार्गावर उभं राहण्याची प्रेरणा मिळाली. यामधून कार्यालयीन कामकाजातही पारदर्शकता, जबाबदारीची जाणीव, आणि एकत्रित कार्यसंस्कृती यांचा पाया अधिक मजबूत करण्याचा संकल्प करण्यात आला.

अशा प्रकारचे कार्यक्रम हे केवळ सांस्कृतिक परंपरेचा भाग नसून, ते कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात नैतिक मूल्यांचा सन्मान राखण्याची प्रेरणा देतात. या कार्यक्रमाने एकात्मतेचा भाव, इतिहासाची जाणीव, आणि कार्याच्या माध्यमातून राष्ट्रासाठी काही तरी देण्याची उमेद सर्वांमध्ये जागवली.

एकंदरीत, लोकमान्य टिळक जयंती साजरी करताना कार्यालयातील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांनी त्यांच्या विचारांना आदरांजली अर्पण करत, देशहितासाठी निष्ठेने कार्य करण्याचा नवा संकल्प केला.




**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती**







## 10. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे राज्य योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 5 दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम ( माहे जुलै 2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 01 दि. 07/07/25 ते 11/07/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषय: वन व वन्यजीव विषयक कायदे व त्यांची अंमलबजावणी.** | | 33 |
| | | | 1.Crime Detection मध्ये Cyber Cell चे महत्व. | श्री. आकाश सारडा, वनरक्षक. | |
| | | | 2.वनरक्षक व वनपाल यांची कार्ये नियतक्षेत्र तपासणी बाबत कार्यपध्दती.<br>3. वनगुन्हे हाताळण्याबाबतची कार्यपध्दती.<br>4. वन सीमा माहिती व संरक्षण पध्दती महाराष्ट्र वन नियमावली 2014.<br>5. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>6. वन्यजीव (संरक्षण) 1972 सुधारणा 2023.<br>7. अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम 2006 ठळक तरतुदी.<br>8. वन संरक्षण एवं संवर्धन अधिनियम 2023 सुधारीत, ठळक तरतुदी.<br>9. जैविक विविधता (सुधारित) अधिनियम 2023 पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 ठळक तरतुदी.<br>10. वन अपराध तपास पध्दती, नवीन भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2003 प्रमाणे आवश्यक तपासातील तरतुदी.<br>11. वनअपराध तपासपध्दती, दस्तावेज तयार करणे (प्रात्यक्षिक ) | श्री. एस. एम.जगताप, (वि.व.अ. से. नि.) | |
| 02 | **सत्र क्र. 02 दि. 07/07/25 ते 11/07/25** | **लिपिक / लेखापाल** | **विषय: महाकोष (सेवार्थ, बिल पोर्टल, बिम्स प्रणाली)** | | 24 |
| | | | 1. बिम्स प्रणाली ( Grand Carry Forward) करणे.<br>2. बिल पोर्टल T.A Bill.<br>3. बिल पोर्टल Medical Bill.<br>4. वर्ग 3 कर्मचाऱ्यांचे GPF बिल तयार करणे. | श्री. ए.बी. गेडाम, (लिपीक) | |
| | | | 5. पगार बिल तयार करणे. (प्रात्यक्षिक)<br>6. वर्ग 4 कर्मचाऱ्यांचे GPF बिल तयार करणे.<br>7. NPS/DCPS कर्मचाऱ्यांचे पेंशन केस तयार करणे. | श्री. पवन पखाले, (तांत्रिक सहाय्यक,कोषागार कार्यालय, अमरावती.) | |
| 03 | **सत्र क्र. 03 दि. 14/07/25 ते 18/07/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषय: वनअभियांत्रिकी व SMC कामे व पाणलोट व्यवस्थापन.** | | 33 |
| | | | 1. मृद व जलसंधारण तोंडओळख.<br>2. CCT,DCT स्थळनिश्चिती, आखणी, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>3. LBS, स्थळनिश्चिती, आखणी, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>4. गॅबीयन बंधारा स्थळनिश्चिती, आखणी, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>5. माती नालाबांध स्थळनिश्चिती, आखणी, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>6. सिमेंट नालाबांध स्थळनिश्चिती, आखणी, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>7. SMC कामे क्षेत्रीय दौरा. | श्री.अनिल लोखंडे, (अभियंता) | |
| | | | 8. इमारत बांधकाम साहित्य माहिती.<br>9. वनविभागातील विविध इमारत बांधकामाबाबत माहिती. | श्री. एस.एम.सुरजुसे, (सवस.से.नि.) | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 10. इमारत बांधकाम अंदाजपत्रकातील विविध बाबी.<br>11. इमारतीची देखभाल व दुरुस्ती.<br>12. मोजमाप व मोजमापांच्या पध्दती.<br>13.मोजमाप पुस्तिका.<br>14. बांधकाम प्रमाणके तयार करण्याची पध्दती. | | |
| 04 | **सत्र क्र. 04 दि. 14/07/25 ते 18/07/25** | **लिपिक / लेखापाल वनरक्षक / वनपाल** | **विषय: माहिती अधिकार अधिनियम** 2005, POSH-20213 **व लोकसेवा हमी कायदा**.<br>1. माहिती अधिकार अधिनियम-2005.<br>2. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम 2013.<br>3. लोकसेवा हमी कायदा-2015. | प्रा.श्री. राजेश पाटील, रा. अमळनेर. | 27 |
| 05 | **सत्र क्र. 05 दि. 21/07/25 ते 25/07/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषय: औषधी वनस्पती, रानभाज्या, दुर्मिळ वनस्पती तसेच कुरण विकास व व्यवस्थापन**.<br>1. औषधी वनस्पती.<br>2. रानभाज्या.<br>3. दुर्मिळ वनस्पती RET Species.<br>4. जैविक विविधता PBR रजिष्टर तयार करणे.<br>5. संस्थेतील विविध वनस्पतीची ओळख क्षेत्रिय दौरा. | श्री. आर. बी. गिरी, व.अ.से.नि. | 34 |
| | | | 6. गवाताच्या विविध प्रजाती व त्यांची ओळख.<br>7. कुरण विकास व व्यवस्थापन.<br>8. कुरण विकास व व्यवस्थापन क्षेत्रिय दौरा. | डॉ. श्रीकांत सोनोने. | |
| 06 | **सत्र क्र. 06 दि. 21/07/25 ते 25/07/25** | **लिपिक / लेखापाल वनरक्षक / वनपाल** | **विषय: व्यक्तीमत्व विकास (Personality Development)**<br>1. न्युरो लिंगुविस्टिक प्रोग्रामिंग (NLP) ओळख आणि महत्व.<br>2. ताण तणाव व्यवस्थापन प्रात्यक्षिके (NLP Practicals) | श्री. एस.एस.आकेवार. कवायत शिक्षक, व.प्र.सं. चिखलदरा. | 35 |
| | | | 3. Self Awareness.<br>4. Personality Development.<br>5. Positive Attitude.<br>6. Communication skill.<br>7. Public Speaking & Presentation skill.<br>8. Stress Management.<br>9. Time Management.<br>10. Conflict Management.<br>11. Emotional intelligence. | श्री. रागीब अहमद, ( तज्ञ व्य.वि. ) | |
| | **एकुण प्रशिक्षणार्थी** | | | | 186 |

**वनरक्षक, वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 01 ( दि. 07/07/2025 ते 11/07/2025 )**
**विषय: वन व वन्यजीव विषयक कायदे व त्यांची अंमलबजावणी.**








# लिपीक ,लेखापाल प्रशिक्षण सत्र क्र. 02 ( दि. 07/07/2025 ते 11/07/2025 )
## विषय: महाकोष (सेवार्थ, बिल पोर्टल, बिम्स प्रणाली)









वनरक्षक, वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 03 (दि. 14/07/2025 ते 18/07/2025 )

विषय: वनअभियांत्रिकी व SMC कामे व पाणलोट व्यवस्थापन.









लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 04 (दि. 14/07/2025 ते 18/07/2025)

विषय: माहिती अधिकार अधिनियम 2005, POSH-2013 व लोकसेवा हमी कायदा.









**वनरक्षक / वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 05 (दि. 21/07/2025 ते 25/07/2025)**
**विषय: औषधी वनस्पती, रानभाज्या, दुर्मिळ वनस्पती तसेच कुरण विकास व व्यवस्थापन.**









**लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल प्रशिक्षण सत्र क्र.** 06 ( **दि.** 21/07/2025 **ते** 25/07/2025 )

**विषय: व्यक्तीमत्व विकास** (Personality Development)









प्रशिक्षणार्थींचे पाच दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घ्येण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.